मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

www.rajdand.com

। पश्चिम महाराष्ट्र ।

follow us : /rajdandlive

RNI Regd No.७२१०५/९९ ✻ वर्ष २५ ✻ अंक २९८ सातारा ✻ मंगळवार दि २३ जुलै २०२४ ✻ पाने ८ ✻ किंमत ५ रू/

# तासवडे परिसरातील स्थानिकांच्या टोल प्रश्नांवर तात्पुरता तोडगा

## स्थानिकांच्या विरोधाला यश



**उंब्रज :** तासवडे येथील टोल नाक्यावर स्थानिक वाहनधारकांची टोलवसुली सुरू झाल्याने गेल्या महिन्याभरा पासून टोलनाक्यावरील वातावरण चिघळले होते. या प्रश्नावर सोमवारी कराड येथील शासकीय विश्रामगृहात महामार्ग प्राधिकरण, टोल व्यवस्थापन यांच्यात संयुक्तिक बैठक झाली. बैठकीत स्थानिकांच्या टोल प्रश्नांवर तात्पुरता तोडगा काढण्यात आला असून पुढील दोन महिन्यांसाठी दहा किलोमीटर परिघातील स्थानिक वाहनधारकांना कसल्याही प्रकारे टोल आकारला जाणार नाही. दरम्यान ही टोल माफी कायमस्वरूपी रहावी या मागणीवर स्थानिक नागरिक ठाम आहेत.

कराड येथील शासकीय विश्रामगृहामध्ये महामार्ग प्राधिकरण व तासवडे टोल व्यवस्थापन तसेच विविध ग्रामपंचायतींचे पदाधिकारी, सर्वपक्षीय नागरिक व स्थानिक वाहन धारकांची टोलमाफी संदर्भात बैठक झाली. या बैठकीत महामार्ग प्राधिकरणाकडून तासवडे टोलनाक्याच्या दहा किलोमीटरवर परिघातील सर्व स्थानिकांना दोन महिने टोल माफी देण्याचा निर्णय घेतला आहे. परंतु सर्वपक्षीय स्थानिक कायमस्वरूपी टोलमाफी मिळावी यावर ठाम राहिले. यावेळी बैठकीत अधिकाऱ्यांच्यावर सर्वपक्षिय स्थानिकांनी अक्षरशः प्रश्नांचा भडीमार केला.

महामार्गाचे हस्तांतरण झाल्यानंतर नवीन आलेल्या टोल व्यवस्थापनाने गेल्या काही दिवसापासून स्थानिकांच्याकडून अचानक टोल घेतला जात होता. या विरोधात सर्वपक्षीय स्थानिकांनी एकत्र येत टोलमाफी मिळावी यासाठी जोरदार आंदोलन केले होते. सर्वपक्षीय स्थानिक टोल माफी मिळावी याबाबत ठाम होते.

या आंदोलनाची दखल घेत सोमवारी कराड येथील शासकीय विश्रामगृहावर बैठक घेण्यात आली. या बैठकीत महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प संचालक, टोल प्रशासनाचे अधिकारी, पोलीस प्रशासन आणि सर्वपक्षीय स्थानिक उपस्थित होते. यावेळी बैठकीत सर्वपक्षीय स्थानिकांनी गेल्या वीस वर्षापासून आम्हा स्थानिकांना टोलमाफी होती. आमच्याकडून कधीही टोल घेतला नाही. परंतु नवीन आलेले टोल प्रशासन आमच्याकडून टोल घेत आहे. तसेच मासिक पासाची सक्ती करत आहेत. तो आम्हाला मान्य नाही.

आमची महामार्गाच्या रुंदीकरणांमध्ये जमीन गेली आहे, व्यवसाय उधस्त झाले आहेत. टोलनाक्यावरून आम्हाला अनेक वेळा जावे लागते. त्यामुळे स्थानिकांच्यासाठी पूर्वीची टोलमाफीची सवलत कायम ठेवावी. स्थानिकांचा टोल घेण्यात येऊ नये अशी आक्रमक भूमिका घेतली. तसेच स्थानिकांच्यासाठी टोल नाक्यावर वेगळ्या दोन लेन बनवण्यात यावेत याची मागणी करण्यात आली.

बैठकीत स्थानिकांनी महामार्ग प्राधिकरणाचे अधिकाऱ्यांच्यावर अक्षरशः प्रश्नांचा भडीमार केला.

तसेच तासवडे येथील टोलनाका गेल्या वीस वर्षापासून आमच्या मानगुटीवर बसला आहे तो टोलनाका जिल्ह्याच्या हद्दीवर न्यावा. अन्यथा या विरोधात स्थानिकांचा उद्रेक होईल असा इशारा दिला.यानंतर महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प संचालकांनी याबाबत आपली भूमिका स्पष्ट करत दोन महिन्यांनी टोलनाक्याचे आधुनिकीकरण होणार आहे. तोपर्यंत तासवडे टोलनाक्याच्या दहा किलोमीटर परिघातील सर्व स्थानिकांना पूर्वीप्रमाणेच टोलमाफी देण्यात येईल असा निर्णय जाहीर केला. सोमवारी सकाळी १० च्या सुमारास कराड येथील शासकीय विश्रामगृहात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. परंतु स्थानिकांचा प्रश्न अधिकाऱ्यांनी टोलनाक्यावर येवून सोडवावा अशी मागणी करीत स्थानिक नागरीक बैठकीसाठी तासवडे टोलनाक्यावर जमा झाले. आम्ही कराडला जाणार नाही अशी भूमिका घेतली मात्र त्यानंतर झालेल्या चर्चेनंतर स्थानिकांनी बैठकीसाठी कराडला जाण्याची भूमिका घेतली. परंतु महामार्ग प्राधिकरणाचे अधिकारी व टोल व्यवस्थापनाच्या आडमुठ्या धोरणाबद्दल अनेकांनी नाराजी व्यक्त केली.



# आरक्षणावर मुख्यमंत्री शरद पवार चर्चा

## साखर कारखाने, दुधाच्या प्रश्नात लक्ष घालण्याची शिंदेंना विनंती

**मुंबई :** मराठा आणि कुणबी एकच आहेत आणि सगेसोयरेबाबतची अधिसूचना अंतिम करावी या मराठा समाजाच्या प्रमुख मागण्यांवरून निर्माण झालेली कोंडी फोडण्याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्यात सोमवारी सविस्तर चर्चा झाली. साखर कारखान्यांना मदत करताना विरोधकांच्या कारखान्यांना सापत्न वागणूक दिली जात असल्याची तक्रार करतानाच दूध दराच्या प्रश्नाची लवकर सोडवणूक करण्याची मागणी पवार यांनी शिंदे यांच्याकडे केली.

मराठा आरक्षण तसेच दूध उत्पादकांचे वाढीव दरासाठी सुरू असलेले आंदोलन आणि साखर कारखान्यांच्या विविध प्रश्नांवरून पवार यांनी आज मुख्यमंत्री शिंदे यांची भेट घेतली. काही दिवसांपूर्वीच अन्न व नागरी पुरवठामंत्री आणि ओबीसी समाजाचे नेते छगन भुजबळ यांनी पवार यांची भेट घेऊन मराठा-ओबीसी वादात लक्ष घालण्याची विनंती केली होती. त्या वेळी या विषयावर आपण मुख्यमंत्र्यांशी चर्चा करू अशी ग्वाही पवार यांनी भुजबळ यांना दिली होती. त्यानुसार ही भेट झाल्याचे सांगण्यात येते.

### दूध उत्पादक संघर्ष समितीची भेट

**या वेळी पवार यांच्या समवेत दूध उत्पादक शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने डॉ. अजित नवले, विनोद देशमुख, अभिजित देशमुख, बबलू देशमुख, प्रकाश देशमुख व नामदेव साबळे यांच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्र्यांची भेट घेतली.दुधाला ४० रुपये भाव मिळावा, दुधाला एफ.आर.पी व रेव्हेन्यू शेअरिंगचे धोरण लागू करावे, दूध भेसळ थांबावी, पशुखाद्याचे दर कमी करावेत आदी मागण्या या वेळी मुख्यमंत्र्यांकडे करण्यात आल्या. त्यावर या प्रश्नात लक्ष घालून निर्णय घेण्याची ग्वाही शिंदे यांनी शिष्टमंडळास दिली.**

मराठा समाजाने पुन्हा एकदा आंदोलन सुरू केले असून मनोज जरांगे पाटील यांनी आंतरवली सराटी येथे पुन्हा उपोषण सुरू केले आहे. मराठा समाजास कुणबी जात प्रमाणपत्र देतांना सगेसोयरेबाबत सरकारने काढलेली अधिसूचना अंतिम करावी, तसेच मराठा कुणबी असल्याच्या ५७ लाख नोंदी सापडल्या असून त्याच्या आधारे मराठा आणि कुणबी एकच असल्याचे आणि या समाजास इतर मागार प्रवर्गाचे आरक्षण देण्याची मागणी जरांगे पाटील यानी लावून धरली आहे. सगेसोयरेबाबतच्या अधिसूचनेवरील हरकतींवर १३ जुलै पूर्वी निर्णय घेण्याचे आश्वासन सरकारने दिले होते. मात्र त्याची अंमलबजाणी झाली नसल्याचा मराठा समाजाचा आरोप आहे. त्याबाबत शिंदे आणि पवार यांच्याच विचारविनिमय झाल्याचे समजते.

त्याचप्रमाणे राज्यातील साखर उद्योगाला दिलासा देण्यासाठी राज्य सरकाच्या हमीवर राष्ट्रीय सहकार निगमकडून राज्यातील साखर कारखान्यांना मार्जिन मनी लोन उपलब्ध करून दिले जात आहे. मात्र यातून विरोधकांच्या कारखान्यांना जाणून बजून वगळले जात असून त्याबाबत लक्ष घालावे.

# शिवसेना ठाकरे गटाचा तीन ऑगस्टला पुण्यात मेळावा; उद्धव ठाकरे यांची उपस्थिती



**पुणे :** आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा मेळावा येत्या तीन ऑगस्ट रोजी होणार आहे. या निमित्ताने या पक्षाकडून निवडणुकीचे रणशिंग फुंकले जाणार आहे. आगामी विधानसभा निवडणूक ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांनी तयारी आणि इच्छुकांनी मोर्चेबांधणी सुरू केली आहे. शहरातील आठही विधानसभा मतदारसंघांवर महाविकास आघाडी आणि महायुतीकडून दावे-प्रतिदावे सुरू झाले आहेत. पक्षपातळीवर बैठका, संघटनात्मक बांधणीबरोबरच मेळावे सुरू झाले असतानाच शिवसेनेकडूनही विधानसभा निवडणुकीची तयारी सुरू करण्यात आली आहे.

विधानसभा निवडणुकीसाठी कसबा, हडपसर आणि कोथरूड विधानसभा मतदारसंघावर शिवसेनेकडून दावा करण्यात आला आहे. यातील हडपसर आणि कोथरूड विधानसभा मतदारसंघात शिवसेनेचे माजी आमदार आहेत. त्याचबरोबर कसबा विधानसभा मतदारसंघातही शिवसेनेची ताकत आहे. या पार्श्वभूमीवर या मेळाव्यात या तिन्ही मतदारसंघांतील इच्छुकांकडून जोरदार शक्तिप्रदर्शन होण्याची शक्यता आहे.

गटप्रमुखांना मार्गदर्शन करणार आहेत. गणेश कला क्रीडा रंगमंच येथे हा मेळावा होण्याची शक्यता आहे. या मेळाव्याच्या दृष्टीने शहर पातळीवर नियोजनही सुरू करण्यात आले आहे. सचिन अहिर यांच्या अध्यक्षतेखाली येत्या दोन ते तीन दिवसांत बैठक होणार आहे, अशी माहिती शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे शहरप्रमुख संजय मोरे यांनी दिली.

विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने पुण्यात भारतीय जनता पक्ष आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचा मेळावा झाला होता. भाजपच्या मेळाव्यात केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी उद्धव ठाकरे यांना लक्ष्य केले होते. 'औरंगजेब फॅन क्लब'चे ठाकरे हे अध्यक्ष आहेत, अशी कडवट टीका शहा यांनी केली होती. या पार्श्वभूमीवर ठाकरे पुण्यातील मेळाव्यात या टीकेला काय उत्तर देतात, याबाबत उत्सुकता असणार आहे.



## मराठा समाजातील विद्यार्थ्यांच्या अडचणी दूर होणार!

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा मोठा निर्णय

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी २०२४ -२५ मध्ये अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांना विविध शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्याची मूदतवाढ दिली आहे. यामुळे मराठा समाजाच्या मुलांना दिलासा मिळाला आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विद्यार्थ्यांना दिलासा देणारा मोठा निर्णय घेतला आहे. २०२४ -२५ मध्ये अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांना विविध शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी अर्ज केल्याच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या कालावधीपर्यंत मुदत देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आता विशेषत: मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र मिळण्यात येणाऱ्या अडचणीही दूर होणार आहेत. जात प्रमाणपत्र हे विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्वाचे दस्ताऐवज आहे. ज्याआधारे शासनाच्या स्कोलरशीप आणि फ्रीशीपसाठी योजनांचा लाभ विद्यार्थ्यांना घेता येतो. शासनाने कुंणबी नोद असलेल्या मराठा समाजाच्या सग्यासोयऱ्यांना कुणबी जात प्रमाणपत्र देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार मराठा समाजातील विद्यार्थी अर्ज करत आहेत.

# मुंबईसह किनारपट्टी, पश्चिम घाटपरिसरात तीन दिवस पावसाचा जोर

**पुणे :** मुंबईसह किनारपट्टी, पश्चिम घाटाचा परिसर आणि मध्य महाराष्ट्रातील काही ठिकाणी संततधार कायम असून पुढील तीन दिवस मध्यम ते मुसळधारेचा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, उत्तर छत्तीसगड व लगतच्या भागावर असलेले कमी दाबाचे क्षेत्र आता पूर्व मध्य प्रदेश आणि छत्तीसगडवर सक्रिय आहे. त्यामुळे विदर्भातील पावसाचा जोर कमी झाला आहे. सोमवारी दिवसभर विदर्भात तुरळक ठिकाणांचा अपवाद वगळता हलक्या सरी पडल्या. पुढील तीन दिवस विदर्भात पावसाचा जोर कमी राहणार आहे.

समुद्रसपाटीवरील गुजरातपासून केरळपर्यंत कमी दाबाचा पट्टी सक्रिय आहे. त्यामुळे अरबी समुद्रातून येणाऱ्या बाष्पयुक्त वाऱ्याचा जोर कायम आहे. त्यामुळे किनारपट्टी, घाट परिसरात आणि मध्य महाराष्ट्रातील काही ठिकाणी पावसाचा जोर कायम आहे. पुढील तीन दिवस मुंबईसह किनारपट्टी आणि घाट परिसरात मध्यम ते मुसळधारेचा अंदाज आहे.

सोमवारी दिवसभरात डहाणूत ७१, कुलाबा ३५ सातांक्रुज १९, रत्नागिरी १४ आणि महाळेश्वरात ३७ मिमी पावसाची नोंद झाली आहे. राज्याच्या अन्य भागात पावसाचा फारसा जोर नव्हता

मंगळवारसाठी इशारे

लाल इशारा - रत्नागिरी, सातारा

नारंगी इशारा - सिंधुदुर्ग, कोल्हापूर, रायगड, पुणे

पिवळा इशारा - मुंबई, ठाणे, पालघर, नाशिक, धुळे, नंदूरबार आणि विदर्भ



# कोयनेतून विसर्ग नसताना कृष्णेच्या पाणी पातळीत वाढ

**सांगली :** कोयना धरणातून अद्याप विसर्ग सुरू केलेला नसतानाही गेले चार दिवस सुरू असलेल्या संततधार पावसामुळे कृष्णा नदीतील पाणी पातळी वेगाने वाढत आहे. गेल्या २४ तासात कृष्णेची पाणीपातळी दहा फुटांनी वाढली असून चांदोली धरणात पाण्याने सांडवा पातळी गाठल्याने विसर्ग केला जाणार असल्याने वारणा काठी सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

गेल्या २४ तासात जिल्ह्याचा पूर्व भाग वगळता सर्वत्र मुसळधार पाऊस पडत असून वाळवा तालुक्याच्या काही भागात अतिवृष्टी झाली आहे. काल सायंकाळी पाच वाजल्यापासून कृष्णा नदीतील पाणीपातळी झपाट्याने वाढत असून आज सकाळी कृष्णेचे पाणी औदुंबरातील दत्त मंदिरात पोहोचले. चांदोली धरणातील पाणीसाठा गतीने वाढत असून सांडवा पातळीपर्यंत पोहोचले आहे. धरणातील साठा नियंत्रित राखण्यासाठी चक्राकार दरवाजातून नदीपात्रात केव्हाही विसर्ग करण्यात येईल, तरी वारणाकाठी राहणार्या नागरिकांनी सतर्कता बाळगावी असे आवाहन धरण व्यवस्थापनाकडून सोमवारी करण्यात आले आहे. चांदोली धरणात आज सकाळी आठ वाजता २६.८१ टीएमसी पाणीसाठा झाला असून १ हजार ५९२ क्युसेकचा विसर्ग सध्या करण्यात येत आहे. तर कोयनेतील पाणीसाठा ६०.४३ टीएमसी झाला आहे.

गेल्या २४ तासात वाळवा तालुक्यात ताकारी आणि बहे मंडळामध्ये अतिवृष्टीची नोंद झाली आहे. या ठिकाणी १२५.८ मिलीमीटर पाऊस एका दिवसात झाला. तर शिराळा तालुक्यात सर्वाधिक म्हणजे ७७.८ मिलीमीटर नोंदला गेला असल्याची माहिती पूरनियंत्रण कक्षातून देण्यात आली. शिराळ्यात मडळ निहाय झालेला पाउस कोकरूड ७२.३, शिराळा ६६, शिरसी ६५.५, मांगले ७९.५, सागाव ७८.५ आणि चरण १०४,८ मिलीमीटर झाला. यामुळे वारणा नदीला पूर आला असून अनेक ठिकाणी नदीचे पाणी पात्राबाहेर पडले आहे. ऐतवडे, काखे मांगले पूल पाण्याखाली गेले आहेत. यामुळे या मार्गावरील वाहतूक बंद ठेवण्यात आली आहे.

जिल्ह्यात सरासरी २८.२ मि. मी. पावसाची नोंद झाली असून अन्य तालुक्यांत झालेला पाऊस असा - मिरज २१.५, जत २, खानापूर-विटा १२.१, वाळवा-इस्लामपूर ६०.८, तासगाव १४.१, आटपाडी २.४, कवठेमहांकाळ ७.६, पलूस ३२.३ आणि कडेगाव २२.७ मिलीमीटर.

# पंतप्रधानांना गप्प करण्याचा विरोधकांचा असवैधानिक प्रयत्न : मोदी यांची टीका

**नवी दिल्ली :** राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील पंतप्रधानांच्या आभारदर्शक भाषणाच्या वेळी विरोधकांनी केलेल्या घोषणाबाजीचा उल्लेख करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विरोधकांवर टीका केली. पंतप्रधानांना गप्प करण्याचा प्रयत्न तब्बल अडीच तास करणे हे लोकशाही तत्वात बसणारे नाही. तसे करूनही विरोधकांना त्याबद्दल मुळीच पश्चात्ताप नाही, असे मोदी म्हणाले. राजकीय मतभेदांना बाजूला ठेऊन विधायक पध्दतीने सभागृहातील चर्चेत सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी सर्वपक्षीय खासदारांना केले.

अर्थसंकल्पीय अधिवेशनात उद्या केंद्र सरकारचा अर्थसंकल्प सादर करण्यात येणार आहे. त्यापूर्वी आज अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी मोदी यांनी विरोधकांना लक्ष्य केले.

अनेक खासदारांना तब्बल दहा वर्ष सभागृहात बोलण्याची संधी मिळालेली नाही. त्यांना त्यांच्या मतदारसंघातील अडचणी, मतदारांच्या भावना संसदेत मांडता आल्या नाही. विरोधकांपैकी काही पक्षांच्या नकारात्मक राजकारणामुळे संसदेचा बहुमूल्य वेळ वाया गेला आहे अशी टीका मोदी यांनी केली.

भारतीय स्वातंत्र्याला शंभर वर्ष पूर्ण होत असताना भारताला विकसित राष्ट्र घडविण्याचा आमचा संकल्प आहे. उद्या सादर होणारा अर्थसंकल्प ही त्याच दिशेने असेल. एक अतिशय मजबूत अर्थसंकल्प आणि सादर करू. अमृत काळातील हा अर्थसंकल्प आमच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा आहे. सरकारच्या पुढील पाच वर्षांच्या कार्याची दिशा ठरविणारा हा अर्थसंकल्प असणार आहे, असेही मोदी यांनी नमूद केले.

# संघाच्या कार्यक्रमात सहभागी होण्याबाबत शासकीय कर्मचाऱ्यांवरील निर्बंध उठविले : विरोधक संतप्त

**नवी दिल्ली :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखेत व कार्यक्रमात शासकीय अधिकारी व कर्मचारी सहभागी होऊ शकणार आहेत. याबाबत वेळोवेळी घालण्यात आलेले निर्बंध केंद्रीय गृहमंत्रालयाने उठविले आहेत. या निर्णयाचे संघाकडून स्वागत करण्यात आले आहे. मात्र, सरकारच्या या निर्णयामुळे विरोधकांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची शाखा आणि कार्यक्रमांना शासकीय कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहू नये, असे निर्बंध सन १९६६, १९७० आणि १९८० मध्ये केंद्र सरकारने घातले होते. विद्यमान राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारने हे निर्बंध उठवले आहेत.

**लोकशाहीला बळकटी देणारा निर्णय**

केंद्र सरकारचा हा निर्णय कालानुरूप योग्य असल्याचे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचार प्रमुख सुनील आंबेकर यांनी सांगितले. मागील ९९ वर्षापासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघ राष्ट्र उभारणीचे काम करत आहे. देशाची सुरक्षा आणि एकता कायम राखण्यासाठी, त्याचप्रमाणे नैसर्गिक आपत्तींना सामोरे जाण्यासाठी संघाने महत्त्वाचे योगदान दिले आहे. याबद्दल वारंवार संघाची प्रशंसाही करण्यात आली आहे. मात्र, काही वेळा केंद्रातील सरकारांनी राजकीय स्वार्थासाठी संघाच्या कार्यक्रमात सहभागी होण्यापासून शासकीय कर्मचाऱ्यांना रोखणारे निर्बंध अकारण लादण्यात आले. विद्यमान सरकारने हे निर्बंध उठवण्याचा घेतलेला निर्णय अतिशय योग्य आणि लोकशाहीला बळकटी देणार आहे, असेही आंबेकर म्हणाले.

**शासकीय कर्मचाऱ्यांमध्ये फूट पाडण्याचा डाव**

महात्मा गांधी यांच्या हत्येनंतर तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी संघावर बंदी घातली होती. भारताचा राष्ट्रध्वज असलेल्या तिरंग्यालाही संघाने विरोध केला होता. त्याबद्दल सरदार पटेल यांनी त्यांना तंबीही दिली होती. अशा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यक्रमात सहभागी होण्याबद्दल शासकीय कर्मचाऱ्यांवर असलेले निर्बंध नरेंद्र मोदी यांनी उठवले आहेत. यापूर्वीच्या दहा वर्षात सर्व संवैधानिक आणि स्वायत्त संस्थांवर कब्जा करण्यासाठी त्यांनी याच संघाचा उपयोग करून घेतला आहे. आता निर्बंध उठवून विचारसरणीच्या आधारावर शासकीय कर्मचाऱ्यांमध्ये फूट पाडण्याचा भाजपचा डाव आहे, असा आरोप काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी केला आहे.

**भाजपच्या मित्र पक्षांनी भूमिका स्पष्ट करावी**

पंडित नेहरू आणि सरदार वल्लभभाई पटेल यांच्या सरकारने संघावर बंदी घातली होती. संघ हिंदु राष्ट्राची भाषा करतो याचा अर्थ त्यांना संविधान मान्य नाही. भारतातील वैविध्य त्यांना मान्य नाही.

त्यामुळे मुळात अशा संस्था संघटनांवर बंदीच घातली जाणे आवश्यक आहे, अशी मागणी करत एमआयएमचे प्रमुख खासदार असदुद्दीन ओवेसी यांनी, अशा अनेक सास्कृतिक संघटना आहेत की ज्यांचा हिंसेवर आधारलेल्या कट्टर डाव्या विचारसरणीवर विश्वास आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाप्रमाणे अशा संस्था संघटनाही चालविण्यास परवानगी देणार का, असा सवाल त्यांनी केला. सरकारच्या या निर्णयावर त्यांचे मित्रपक्ष असलेल्या राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील घटक पक्षांनी आपली भूमिका स्पष्ट करणे आवश्यक आहे, असेही ते म्हणाले.

# रोटरी कला प्रदर्शनास उत्स्फूर्त प्रतिसाद

## डॉ. अस्मिता फासे यांच्या कलाकृतीचे कौतुक

**कराड :** स्व.यशवंतराव चव्हाण स्मृती सदन, कराड येथे रोटरी क्लब ऑफ कराड आयोजित रो.डॉ.अस्मिता फासे निर्मित दोन दिवसीय प्रतिबिंब कराड रोटरी कला प्रदर्शनास कराडवासियांसह कलाप्रेमींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कलेचा अविष्कार दाखवणारे रोटरी कला प्रदर्शनाचे कौतुक करत रो.डॉ. अस्मिता फासे यांच्या कलाकृतीस दाद दिली.

पद्मश्री प्रसिद्ध नेत्रतज्ञ डॉ. तात्याराव लहाने यांच्या हस्ते व असिस्टंट गव्हर्नर रो.राजीव रावळ यांच्या उपस्थितीत रो.डॉ.अस्मिता फासे निर्मित प्रतिबिंब कराड रोटरी कला प्रदर्शनाचे उद्घाटन झाले होते. दोन दिवस चाललेले हे नाविन्यपूर्ण कला प्रदर्शन सकाळी १० ते सायंकाळी ८ वाजेपर्यंत पाहण्यासाठी खुले होते. या कला प्रदर्शनात नेत्रतज्ञ रो.डॉ.अस्मिता फासे यांनी तयार केलेल्या विविध चित्रकृतींनी उपस्थितांचे लक्ष वेधले. डॉ.अस्मिता फासे यांना विद्यार्थीदशेपासून चित्रकलेची आवड होती. परंतु शिक्षण, लग्न आणि त्यानंतर मेडिकल प्रॅक्टिस, घरगुती जबाबदाऱ्या यामुळे त्यांच्यामधला चित्रकार समाजासमोर आला नव्हता. त्यांनी कोरोना काळातील लॉकडाऊन मध्ये ब्रश हातात घेऊन लहान-लहान पेंटिंगपासून सुरवात केली आणि आज ऑइल, ऍक्रीलिक प्रकारच्या पेंटिंग्समध्ये देखील प्राविण्य मिळवले आहे. दिवसभर हॉस्पिटलमध्ये रुग्णांची सेवा करून संध्याकाळी मिळणाऱ्या वेळेत त्यांनी त्यांची कला जपलेली आहे. याबद्दल त्यांचे कौतुक सुद्धा होत आहे.

या कला प्रदर्शनाची सांगता माजी खासदार श्रीनिवास पाटील, अर्बन कुटुंबप्रमुख सुभाषराव जोशी, कराड अर्बन बँक चेअरमन डॉ.सुभाष एरम, रोटरी क्लब ऑफ कराड चे प्रेसिडेंट रो.रामचंद्र लाखोले व सेक्रेटरी रो.आनंदा थोरात, रो.डॉ.राहुल फासे यांच्या उपस्थितीत झाली.

यावेळी रो.किरण जाधव यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमास रो.बद्रिनाथ धस्के, रो.शिवराज माने, रो.प्रबोध पुरोहित, रो.जगदीश वाघ, रो.अभय नांगरे, रो.प्रशांत लाड, डॉ.संतोष टकले, डॉ.शेखर कोगळुकर, रो.चंद्रशेखर पाटील, रो.विनायक राऊत आदींसह रोटरी क्लब ऑफ कराडचे पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

# म्हणून जो बायडेन यांनी घेतली अध्यक्षीय निवडणुकीतून माघार

**वॉशिंग्टन :** अमेरिकेच्या अध्यक्षीय निवडणुकीच्या रिंगणातून विद्यमान अध्यक्ष जो बायडेन यांनी माघार घेतली असून त्यांनी उमेदवारीसाठी उपराष्ट्राध्यक्ष कमला हॅरीस यांना पाठिंबा दिला आहे. उमेदवारी माघारीसाठी पक्षांतर्गत दबाव, प्रतिस्पर्धी उमेदवार डोनाल्ड ट्रम्प यांच्यापुढे निभाव न लागणे आणि प्रामुख्याने वाढत्या वयाबरोबर तंदुरुस्तीचा अभाव या प्रमुख कारणांमुळे बायडेन यांना निवडणुकीतून माघार घ्यावी लागली आहे.

निवडणूक प्रचाराच्या सुरुवातीपासूनच ट्रम्प यांनी बायडेन यांच्यापेक्षा अधिक वेगाने पुढे जाण्यास सुरुवात केली आहे. अध्यक्षीय वादविवादात ट्रम्प यांच्यासमोर बायडेन यांचा निभाव लागलेला नाही. या वादात कमी पडल्यामुळे सर्वसामान्य मतदारांमध्ये बायडेन यांची प्रतिमा डागाळली तर ट्रम्प यांची प्रतिमा उजळली. त्यामुळे बायडेन यांनी या निवडणुकीतून माघार घ्यावी, असा सूर खुद्द डेमोक्रॅटिक पक्षातूनच निघू लागला.

बायडन यांचे वय तब्बल ८१ वर्ष आहे. वयानुसार त्यांच्यामध्ये तंदुरुस्तीचा अभाव जाणवत आहे. अनेकदा तो जाहीरपणे दिसूनही आला आहे. निवडणुकीच्या काळात बायडेन हे चालताना अडखळल्याची, धडपडल्याची छायाचित्रही प्रसिद्ध झाली आहेत. वयानुसार त्यांना विश्वरत्न होत असल्याचेही अनेक वेळा जाहीर कार्यक्रमात दिसून आले. एकदा ते आपणच निवडलेल्या उपाध्यक्ष कमला हॅरीस यांचेच नाव विसरून गेले. इतकेच नाही तर हरीश यांचा उल्लेख त्यांनी ट्रम्प असा केला. नाटोच्या बैठकीत युक्रेनचे राष्ट्रप्रमुख व्लादिमिर झेलेंस्की यांना त्यांनी पुतीन म्हणून संबोधले.

बायडेन यांच्या राष्ट्राध्यक्ष म्हणून सध्याच्या कामगिरीवर मतदार नाखूश असल्याचे दिसून येत आहे. देशासमोरील आर्थिक प्रश्नांसह कोणत्याही समस्येवर बायडेन प्रभावी उपाययोजना करू शकले नाहीत, अशी भावना मतदारांमध्ये दिसून येत आहे. अमेरिकेसार अपेक्षित असणारी आक्रमकता आणि ठाम निर्णयक्षमता बायडेन यांच्यामध्ये दिसून येत नाही अशीही टीका केली जाते. खुद्द माजी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा आणि अमेरिकन काँग्रेसच्या माजी सभापती नॅन्सी पेलोसी यांनी देखील गार्डन यांच्या उमेदवारीबद्दल नाराजी व्यक्त करून त्यांना माघार घेण्याचे आवाहन केले आहे.

ट्रम्प यांच्यावर झालेला गोळीबार हा या निवडणुकीत महत्त्वाचा मुद्दा ठरला आहे. त्यांच्या हप्त्याच्या असफल प्रयत्नामुळे मतदारांमध्ये त्यांच्याबद्दल सहानुभूतीची लाट तयार होणे शक्य आहे. बायडेन यांच्याबद्दलची नाराजी आणि ट्रम्प यांच्याबद्दलची सहानुभूती यामुळे ही निवडणूक एकतर्फी होण्याची शक्यता निर्माण झाली होती.. अर्थातच बायडेन यांच्यावर माघारीसाठी येत असलेल्या दबावात वाढ झाली. त्यामुळे अखेर बायडेन यांनी निवडणुकीतून माघार घेऊन कमला यांना उमेदवारीसाठी पाठिंबा जाहीर केला.

# ग्रामविकास अधिकारी लाजलचपतच्या जाळ्यात

**कोल्हापूर :** हातकणंगले तालुक्यातील कबनूर ग्रामपंचायतमधील ग्रामविकास अधिकारी गणपत धनाजी आदलिंग (रा. कृष्णतारा अपार्टमेंट, मराठा कॉलनी कसबा बावडा ) यांच्यावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कारवाई केली. नऊ हजार रुपयांची लाच स्विकारताना अदलिंगला रंगेहाथ पकडले. जिल्हा परिषद मुख्यालयच्या इमारतीत कारवाई झाल्याने कर्मचाऱ्यांमुळे खळबळ उडाली.

या प्रकरणातील तक्रारदार हा कॉन्ट्रॅक्टर आहे. त्यांनी कबनूर गावातील वॉर्ड नंबर दोनमधील वाढीव पाइप लाइन बसविण्याच्या कामाची निविदा भरली आहे.निविदेप्रमाणे कामाची विचारणा करण्यासाठी तक्रारदार कॉन्ट्रॅक्टरनी आदलिंग यांची भेट घेतली. तेव्हा आदलिंग यांनी कामाची वर्क ऑर्डर देण्यासाठी कॉन्ट्रॅक्टरकडे नऊ हजार रुपयांची लाच मागितली. तक्रारदारांनी यासंबंधी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला कळविले. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सोमवारी सापळा लावला. तक्रारदारांकडून नऊ हजाराची लाच घेताना आदलिंग यांना रंगेहाथ पकडले. शाहूपुरी पोलिस ठाण्यात त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात येत आहे. पोलिस निरीक्षक बापू साळुंखे , पोलिस हेड कॉन्स्टेबल सुनील घोसाळकर, सचिन पाटील, संदीप पवार यांच्या पथकाने ही कारवाई केली.

# लाडका कंत्राटदारानंतर आता मुख्यमंत्र्यांची लाडका बिल्डर योजना

## अनुभव नसलेल्या चड्डा या बिल्डरच्या घशात ४०० कोटी ! विरोधी पक्षनेत्याच्या आरोप

**मुंबई :-** गृहप्रकल्प न राबविलेल्या चड्ढा नावाच्या खासगी विकासकाला पंतप्रधान आवास योजनेच्या नावाखाली शासनाने बिनव्याजी ४०० कोटी रुपये मंजूर केले आहेत. त्यामुळे आता मुख्यमंत्री लाडका कंत्राटदार नंतर मुख्यमंत्री लाडका बिल्डर योजना महाराष्ट्रात येणार आहे का? असा संतप्त सवाल करत विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारच्या भ्रष्ट कारभाराची पोलखोल केली.

विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्या प्रचितगड या शासकीय निवासस्थानी आज पत्रकार परिषद आयोजित केली होती. या पत्रकार परिषदेत वडेट्टीवार बोलत होते.

वडेट्टीवार म्हणाले की, सरकारची तिजोरी खासगी बिल्डरसाठी महायुती सरकारने खुली ठेवली आहे. हा महाराष्ट्राच्या तिजोरीवर जाता-जाता घातलेला दरोडा आहे. दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना हा निर्णय मान्य आहे का हा देखील प्रश्न आहे. मे. चड्ढा डेव्हलपर्स आणि प्रमोटर या दिल्लीस्थित कंपनीवर ही मेहेरनजर दाखविण्यात आली आहे. २०२१ मध्ये या विकासकाशी म्हाडाने करार केला. मात्र आतापर्यंत एकाही घराचा ताबा लाभार्थींना दिलेला नाही असे असताना त्याला ४०० कोटींची खिरापत का दिली जातेय. गृहनिर्माण विभागाने असा निधी देण्यास विरोध दर्शविला. त्यानंतरही हा निधी देण्यासाठी कोण दबाव आणतंय याची चौकशी झाली पाहिजे.

सीबीआयने कारवाई केल्यावर तुरूंगात गेलेला डिंपल चड्डा हा बांधकाम व्यावसायिक राज्य सरकारचे पैसे घेऊन परदेशात पळून गेला तर? असा प्रश्न वडेट्टीवार यांनी उपस्थित केला.

बार्टीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती द्यावी: वडेट्टीवार म्हणाले की, बार्टीच्या विद्यार्थ्यांना दोन वर्षापासून शिष्यवृत्ती नाही. विद्यार्थ्यांनी आंदोलन केले. मुख्यमंत्र्यांकडे बैठक झाली तरी देखील सरकारला जाग येत नाही. सरकारची शिष्यवृत्ती द्यायची मानसिकता नाही. कारण कमिशन, टक्केवारी जिथे मिळत नाही तिथे सरकार पैसे खर्च करत नाही. अशी या सरकारच्या कामाची पद्धत आहे. अशा शब्दात वडेट्टीवार यांनी सरकारचे वाभाडे काढले. महाज्योती आणि सारथी या संस्थांच्या विद्यार्थ्यांची देखील अशीच परिस्थिती आहे. या सर्व विद्यार्थ्यांना सरकारने शिष्यवृत्ती द्यावी, अशी मागणी देखील वडेट्टीवार यांनी केली. चंद्रपूर, गडचिरोली पूर परिस्थिती

वडेट्टीवार म्हणाले की, विदर्भात प्रचंड पावसामुळे मोठे नुकसान झाले आहे. गडचिरोली, चंद्रपुर येथील अतिवृष्टीमुळे मोठे नुकसान झाले आहे. नागपूर परिसरात देखील अशीच परिस्थिती आहे. सुरक्षित स्थळी लोकांना हलवून त्यांना आवश्यत सुविधा देणं महत्वाचं आहे. लोकांना सुरक्षित स्थळी हलवून त्यांच्या निवारा, जेवण, आरोग्याची व्यवस्था करावी. पशुधन देखील अडचणीत सापडले असून पशुधन वाचविण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. परिस्थिती नियंत्रणात आल्यावर शासनाने तात्काळ पंचनामे करून नुकसानग्रस्तांना मदत करावी, अशी मागणी . वडेट्टीवार यांनी केली आहे.

# प्रियसीच्या मृतदेहासह दोन मुलांची इंद्रायणी नदीत जिवंत फेकून हत्या, मावळ हदरले

**पिंपरी चिंचवड :** प्रियसीचा गर्भपात करताना तिचा मृत्यू झाला.तिचा मृतदेह इंदोरी येथे आणण्यात आला.पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने तिचा मृतदेह इंदोरी येथील इंद्रायणी नदीत पाशी आणला.तेंव्हा सदर मृत महिलेचे त्यावेळी एक दोन आणि एक पाच वर्षे वयाची दोन मुलेही सोबत होती.सदरच्या महिलेचा मृतदेह इंद्रायणी नदीत फेकून दिला असता ,ती दोन्ही मुले जोरजोरात रडून आरडा ओरडा करू लागली.त्या वेळी त्या दोन नराधमांनी त्या दोन निष्पाप मुलांना देखील जिवंत इंद्रायणी नदीच्या पाण्यात टाकून त्यांची हत्या केली.

ही घटना एमआयडीसी पोलीस स्टेशनच्या हद्दीत ६ ते ९ जुलै च्या दरम्यान पहाटे घडली असल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे.या तिहेरी हत्यामुळे संपर्ण मावळ तालुका हादरला आहे.

या प्रकरणी आरोपी गजेंद्र जगन्नाथ दगडखैर वय - ३७ ( रा.समता कॉलनी वराळे ता.मावळ ) रविदास भानुदास गायकवाड वय-४२ ( रा.डॉन बास्को कॉलनी ,ईश्वरानंद सोसायटी ,सावेडी ता.जि. अहमदनगर यांना एमआयडीसी पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

या प्रकरणी गर्भात करणारी एजंट महिला नाव बुधवंत ( पूर्ण नाव पत्ता माहीत नाही तसेच , कळंबोली येथील अमर हॉस्पिटलच्या एका डॉक्टरसह चौघांच्या विरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पुढील तपास एमआयडीसी पोलीस तपास करीत आहेत.

एमआयडीसी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार बेपता असलेल्या महिलेच्या शोध करीत असताना या घटनेचा संपूर्ण उलगडा झाला.तळेगाव दाभाडे पोलीस स्टेशन मध्ये एक महिला बेपत्ता असले बाबत तक्रार करण्यात आली होती सदरच्या बेपत्ता महिलेचा तपस करीत असताना बेपत्ता महिलेचा प्रियकर राजेंद्र दगडखैर याने आपला मित्र रविकांत गायकवाड याला सदरच्या महिलेचा गर्भात करण्यासाठी ठाणे कळंबोली येथील एका हॉस्पिटल मध्ये पाठवले होते.सदर ठिकाणी गर्भपात करीत असताना नमूद महिलेचा मृत्यू झाला.

त्यानंतर प्रियकराचा मित्र रविकांत गायकवाड हा मयत महिलेचा मृतदेह आणि तिच्या दोन मुलांना घेऊन एमआयडीसी पोलीस स्टेशच्या हद्दीत घेऊन आला.९ जुलै रोजी त्याने प्रियकर राजेंद्र दगडखैर याच्या मदतीने पुरावा नष्ट करण्याच्या हेतूने सदरच्या महिलेचा मृतदेह इंद्रायणी नदीत फेकून दिला.मयत महिलेची दोन्ही मुले हा प्रकार पाहून जोर जोरात रडून आरडा ओरडा करू लागली.हे पाहून त्या दोन्ही नराधमांनी त्या दोन्ही निष्पाप बालकांना इंद्रायणी नदीच्या पाण्यात फेकून दिले.

त्या अनुषंगाने एमआयडीसी पोलीस ठाण्यात संबधित आरोपींच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून एमआयडीसी पोलिसांनी आरोपीना ताब्यात घेतले असून ,पुढील तपास तळेगाव दाभाडे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक प्रदीप रायणावर हे तपास करीत आहेत.मात्र या तिहेरी हत्याकांडाने संपूर्ण मावळ तालुका हादरला असून सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.




# समाजाभिमुख कार्याची ओळख म्हणजे आंतरराष्ट्रीय रोटरी क्लब. : ॲड. इस्माईल पटेल

**शिरोळ :** समाजाप्रती असलेले ऋण फेडण्याकरिता प्रत्येकाने आपण समाजासाठी काहीतरी केले पाहिजे ही भावना जपली पाहिजे.याकरिता स्वतःचा पैसा व वेळ खर्च करून रोटरी या जागतिक सामाजिक संस्थेच्या माध्यमातून समाजाच्या प्रगतीकरिता काम करत सर्वसामान्यांचे जीवनमान उंचाविण्याचा प्रयत्न करत आहे. समाजकार्यातील रोटरी हा परिसस्पर्श आहे.११८ वर्षे झाली आयुष्याचे सोने करण्याची संधी रोटरी देते.या माध्यमातून कायमस्वरूपी टिकणारे सामाजिक उपक्रम हाती घेण्याचे आवाहन रोटरी क्लबचे माजी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर अँड इस्माईल पटेल यांनी केले.

रोटरी क्लब ऑफ हेरिटेज सिटी शिरोळच्या पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण सोहळा माने -देशमुख मंगल कार्यालय येथे रोटे. इस्माईल पटेल यांच्या हस्ते संपन्न झाला.या समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. राष्ट्रगीत,विश्वशांती प्रार्थना आणि मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलनाने या सोहळ्याची सुरुवात झाली.डॉ. अतुल पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक करताना रोटरी क्लब ऑफ हेरिटेज सिटीच्या माध्यमातून केलेल्या सामाजिक कार्याचा आढावा घेतला. मावळते प्रेसिडेंट संजय तुकाराम शिंदे यांनी आपल्या वर्षभरातील कार्याचा आढावा घेतला.

# देऊळगाव राजे सोसायटीच्या चेअरमनपदी सूर्यवंशी यांची निवड

**देऊळगाव राजे :** देऊळगाव राजे, ता. दौंड येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या चेअरमनपदी विष्णुपंत नानासाहेब सूर्यवंशी यांची तर व्हॉईस चेअरमनपदी रेखा रधूनाथ पोळ यांची नुकतीच बिनविरोध निवड करण्यात आली आहे, मागील चेअरमन पांडुरंग गिरमकर आणि व्हाइस चेअरमन संगीता कड यांनी राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या पदावर यांचे निवड करण्यात आली आहे.या संस्थेचे १कोटी २४ लाख भाग भांडवल असुन कर्ज वाटप ६कोटी १४लाख रूपये आहे,

एकूण ११२४सभासद आहेत. यावेळी तुकाराम आवचर, अमित गिरमकर,अभिमन्यू गिरमकर, उध्दव गिरमकर, महादेव सूर्यवंशी, मदन खेडकर, कांतीलाल आवचर, जयवंत गिरमकर, संतोष बुराडे, कानिफ सूर्यवंशी, काका कड,सचिव सुनिल जाधव, सहसचिव मोहन आवचर सर्व संचालक मंडळ आदी उपस्थित होते.



# डी मार्टमधील खाद्यपदार्थांमध्ये आळ्या सापडल्याने मनसे' चे हल्लाबोल आंदोलन

**कोल्हापूर :** ताराबाई पार्क येथील डी मार्ट मध्ये लहान मुलांच्या खाद्यपदार्थांमध्ये आळ्या सापडल्याने मनसेच्या कार्यकर्त्यांनी आज डी मार्ट वर हल्लाबोल केला. तसेच या गोष्टीचा जाब विचारत व्यवस्थापकांना धारेवर धरले. कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. शिवाय तात्पुरतं डी मार्ट बंद करण्यात आले.

स्वच्छ व निवडक माल मिळतो म्हणून ग्राहकांची पावलं आपोआप डी मार्ट कडे वळतात. मात्र येथील खाद्यपदार्थांमध्ये आळ्या सापडल्याने आज मनसेच्या कार्यकर्त्यांनी आक्रमक भूमिका घेत, डी मार्ट वर हल्लाबोल केला. तसेच येथील व्यवस्थापक पदाधिकाऱ्यांना या गोष्टीचा जाब विचारला. इतकी मोठी घटना घडूनही अन्न आणि औषध प्रशासन यांच्यावर का कारवाई करत नाही याचा जाब देखील विचारण्यात आला. डी मार्ट मधील वस्तूंची खरेदी विक्री तात्काळ थांबवण्यात यावी, अशी भूमिका कार्यकर्त्यांनी घेतल्याने पोलीस प्रशासनाने ग्राहकांना डी मार्ट बाहेरच थांबवले तसेच काही काळ डी मार्ट सील करून गुन्हा दाखल करण्याचे आश्वासन मनसे पदाधिकाऱ्यांना दिल्यानंतर आंदोलन थांबवण्यात आले.

आंदोलनामध्ये जिल्हाध्यक्ष राजू दिंडोर्ले शहराध्यक्ष प्रसाद पाटील विद्यार्थी सेना जिल्हाध्यक्ष अभिजीत राऊत, विद्यार्थी सेना शहराध्यक्ष अजिंक्य शिंदे, तालुका उपाध्यक्ष अरविंद कांबळे, शहर सचिव यतीन होरणे, संजय चौगुले, उत्तम वंदुरे, सॅम मुधळे, यश केंबळे, नितेश गणेशाचार्य, यश केंबळे, राघव सरदेसाई, निलेश आजगावकर, वैभव अस्वले , गणेश शिंदे, बाजीराव दिंडोर्ले सहभागी झाले होते.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# क्राईम

## भरधाव कारने दुचाकी चालकास चिरडले

**लोणंद :** लोणंद-शिरवळ रोडवरील गोळेगाव फाट्याजवळ भरधाव कारचालकाने चिरडल्याने गंभीर जखमी होऊन दुचाकीस्वार दत्तात्रय कराडे याचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

याबाबत घटनास्थळावरून मिळालेली माहीती अशी, लोणंद एमआयडीसी जवळील गोळेगाव फाट्याजवळ दत्तात्रय गोपाळ कराडे वय २७ रा. कराडवाडी ता. खंडाळा हा आपल्या एमएच ११ डिके ०३७० या दूचाकीवरून लोणंदच्या दिशेने जात असताना भरधाव वेगाने आलेल्या शेव्हरलेट सेल एमएच ११ बीएच ५३०० कारने चिरडल्याने गंभीर जखमी झाला. त्याला लोणंद येथील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले मात्र छातीला गंभीर दुखापत झाल्याने त्याचा मृत्यू झाला. दरम्यान अपघात केलेला कारचालक पसार झाल्यामुळे नातेवाईकांनी तीव्र संताप व्यक्त केला असून दोषी चालकास तात्काळ अटक करण्याची मागणी केली. लोणंद येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात मयत दत्तात्रय गोपाळ कराडे यांचे शवविच्छेदन केल्यानंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला.

सदर घटनेबाबत दिलीप नबाजी कराडे रा. कराडवाडी ता. खंडाळा यांनी फरार कारचालक विक्रम विठ्ठल चोरमले याच्याविरुद्ध लोणंद पोलीसांत दिली असून लोणंद पोलीस अधिक तपास करत आहेत.

## अपघात प्रकरणी कंटेनर चालकावर गुन्हा

**सातारा :** अपघात करून दुसऱ्या ट्रकचे नुकसान केल्याप्रकरणी कंटेनर चालकाविरुद्ध सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. १९ रोजी दीड वाजण्याच्या सुमारास कोल्हापूर-पुणे महामार्गावर एमएच १४ केए १९८९ या ट्रकमध्ये बिघाड झाल्यामुळे तो रस्त्याच्या कडेला उभा असताना कंटेनर क्र. टीएन ०३ यु ३९७९ वरील चालक करुणानिधी आर याने ट्रकला पाठीमागून जोराची धडक दिली. या अपघातात ट्रकचे सुमारे एक लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. अधिक तपास महिला पोलीस हवालदार माने करीत आहेत.

## सुमारे सव्वादोन कोटींच्या फसवणूक प्रकरणी तिघांवर गुन्हा

**सातारा :** सुमारे सव्वादोन कोटींच्या फसवणूक प्रकरणी तिघांविरोधात शाहूपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. २८ एप्रिल २०२३ ते ९ फेब्रुवारी २०२४ पर्यंत संतोष गुलाबराव शिंदे रा. स्वरूप कॉलनी, सातारा यांचा विश्वास संपादन करून सोन्याच्या लिलावाच्या खरेदी विक्रीचे आमिष दाखवून शिरीष पाटील, सचिन जाधव (दोघेही रा. आष्टा ता. वाळवा जि. सांगली), मयूर मारुती फडके रा. कल्पतरू कॉलनी, जुना वारजे जकात नाका, कर्वेनगर, पुणे यांनी आरटीजीएस तसेच रोख स्वरूपात २ कोटी २७ लाख ९५ हजार रुपये गुंतवणूक करण्यास भाग पाडून फसवणूक केली. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक ढेरे करीत आहेत.

## राहत्या घरातून महिला बेपत्ता

**सातारा :** राहत्या घरातून एक महिला बेपत्ता झाल्याची फिर्याद सातारा तालुका पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. २० रोजी लिंब, ता. सातारा येथील राहत्या घरातून एक महिला बेपत्ता झाल्याची फिर्याद सातारा तालुका पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. अधिक तपास पोलीस हवालदार कुमठेकर करीत आहेत.

## जुगार अड्ड्यावरील छाप्यात दोघांवर कारवाई

**सातारा :** करंजे नाका येथील जुगार अड्ड्यावर शाहूपुरी पोलिसांनी छापा टाकून दोघांवर कारवाई केली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. २० रोजी दुपारी साडेबारा वाजण्याची सुमारास करंजे नाका येथील रिक्षा स्टॉप शेजारील आडोशाला प्रशांत बाबुराव वायदंडे

रा. आकाशवाणी केंद्र शेजारी, सातारा आणि मेहताब जब्बार शेख रा. केसरकर पेठ, सातारा हे दोघे जुगार घेताना आढळून आले. त्यांच्याकडून १२ हजार ३१० रुपये किंमतीचे जुगाराचे साहित्य तसेच एक कॉम्प्युटर हस्तगत करण्यात आला आहे.

## राजवाडा परिसरातून दुचाकीची चोरी

**सातारा :** राजवाडा परिसरातून अज्ञात चोरट्याने दुचाकीची चोरी केल्याची फिर्याद शाहूपुरी पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. १६ रोजी दुपारी दीड वाजण्याच्या दरम्यान विवेक कृष्णा भंडारे रा. भोंदवडे, पोस्ट गजवडी, ता. सातारा यांची वीस हजार रुपये किंमतीची दुचाकी क्रमांक एमएच ११ एएच ८५६९ अज्ञात चोरट्याने राजवाडा सातारा

# महाबळेश्वर तालुक्यात धुवाँधार पाऊस

### गत चार दिवसांपासून पावसाचा पुन्हा जोर सुरूच पर्यटकाची तुरळक गर्दी

**महाबळेश्वर :** तालुक्यात गेल्या चार ते पाच दिवसांपासून पावसाची तुफान बॅटिंग सुरू असून, या मुसळधार पावसामुळे तालुक्यातील नदी नाले ओढे ओसंडून वाहू लागले आहे. चार दिवसापासून संततधार मुसळधार पाऊस पडत असल्यामुळे महाबळेश्वर बिरमणी पूल पाण्याखाली गेल्यामुळे बिरमणी महाबळेश्वर बिरमणी वाहतुक बंद करण्यात आली आहे. २४ तासात १५५.०१ मि मी (६ इंच )पावसाची नोंद करण्यात आली असून महाबळेश्वर परिसरातील जनजीव विस्कळीत झाले आहे महाबळेश्वरात पाऊसाने आज अखेर पर्यत २३१९.५मि मी (९१इंच) पाऊस पडल्याची माहिती हवामान विभागातून देण्यात आली



महाबळेश्वर शहर व परिसरात पावसाने पुन्हा एकदा जोर धरला असून धुवाधार बरसणाऱ्या पावसाने जनजीवन विस्खळीत झाले वेण्णा नदीचे पाणी नदी पात्रा बाहेर आल्या मुळे लिंगमळा परिसराला नदीचे स्वरूप प्राप्त झाले आहे गत चार दिवसात पावसाने दाणादाण उडवली असून जनजीवन विस्खळीत झाले आहे अश्या धुवाधार पावसात देखील वर्षा पर्यटनासाठी पर्यटकांची रेलचेल अनुभवायास मिळत असून शनिवार व रविवार या वीकएंड ला पर्यटकांनी पर्यटनाचा आनंद घेतला पुढील दोन दिवस असाच दमदार पाऊस बरसला तर पावसाचे शतक पूर्ण होईल

रविवारी सकाळ पासून मुसळधार पाऊसाची संततधार सुरूच होती महाबळेश्वर मधील मुख्य बाजारपेठमध्ये पावसामुळे शुकशुकाट जाणवू लागला ठिक ठिकाणी कोळशाच्या शेगडी पेटवून स्थानिक नागरिक शेकोटीचा आनंद घेत होते तर मुसळधार पावसाच्या सरी मध्ये पर्यटक ,दुचाकी स्वार पाऊस अंगावर झेलण्यासाठी अन् धुक्याच्या दुलईचा मनमुराद आनंद लुटण्यासाठी काही हौशी पर्यटकांची तुरळक गर्दी पर्यटन नगरीकडे वळू लागली आहेत. महाबळेश्वर मध्ये पावसाळी हंगामात यावेळी लिंगमळा धबधबा या परिसरातील भागात निसर्गाचं वरदान लाभलं असून, येथील हिरवीगार वृक्षराजी, उंचच-उंच डोंगर रांगा, त्यातून फेसाळणारा जलप्रपात, पर्यटक या पर्यटनस्थळाला भेट देतात. पावसाळा सुरू झाल्यापासून तर येथील निसर्ग हिरवाईने भरून गेला आहे. धो-धो बरसणाऱ्या जलधारा अन् चहूकडे पसरलेली धुक्याची दुलई स्वर्गीय अनुभव देत.

# मराठा आरक्षण रॅली यशस्वी करण्याचा निर्धार

**सातारा :** मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांची शनिवार, दि. १० ऑगस्ट रोजी सातारा येथे रॅली काढण्यात येणार आहे. त्या पार्श्वभूमीवर सातारा जिल्ह्यातील प्रत्येक तालुका व गावनिहाय बैठका घेण्यात येणार आहे. सातारा येथील आरक्षण जनजागृती व शांतता रॅलीला जिल्ह्यातील लाखो मराठा बांधवांच्या उपस्थितीत यशस्वी करण्याचा निर्धार रविवारी मराठा सेवक व आंदोलनकर्त्यांच्या बैठकीत करण्यात आला.

मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील हे शनिवार, दि. १० ऑगस्ट रोजी साताऱ्याच्या दौऱ्यावर येत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या आरक्षण जनजागृती व शांतता रॅलीच्या नियोजनासाठी रविवारी संगमनगर येथील स्वराज्य सांस्कृतिक भवन येथे जिल्ह्यातील आयोजक, आंदोलनकर्ते, मराठा सेवकांची बैठक संपन्न झाली. त्यावेळी सर्वांनी एकमताने निर्धार केला. यावेळी प्रशांत निंबाळकर, राजेंद्र निकम, बाबा शिंदे, विवेक कुराडे- पाटील, डॉ.सत्यजीत पाटील, बाबा जाधव, शैलेंद्र भोईटे, हेमंत जाधव, राजेंद्र बर्गे, शिवाजी चव्हाण, विलासबाबा जवळ, डॉ विकास देशमुख, माऊली सावंत, सुवर्णा पाटील, राहुल शेडगे, जितेंद्र भोसले, अमोल पोळ, प्रमोद सस्ते, राहूल ताटे, सुभाष पवार, सोमनाथ पाटील बालाजी जगदाळे, राजेंद्र पाटील, अमोल घाडगे यांनी रॅली यशस्वी करण्यासाठी विविध सुचना करून प्रत्येक तालुक्यातून हजारोंच्या संख्येने मराठा बांधव उपस्थित राहतील असे सांगितले. यावेळी सातारा, फलटण, माण, खटाव, कोरेगाव, वाई, पाटण,

# बहीण माझी लाडकी अंतर्गत राजपुरीसह पाचगणीत ऑनलाईन पद्धतीने अर्ज

### जिल्हा बँकचे राजेंद्रशेट राजपुरे व समाजसेवक प्रकाश गोळे यांच्या नियोजनातून गावोगावी कॅम्प



**वाई :** महाबळेश्वर तालुक्यात मुख्यमंत्री यांच्या संकल्पनेतून महिला व बाल कल्याण विभागा अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या मुख्यमंत्री बहीण माझी लाडकी योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येत असून त्या अंतर्गत जिल्हा बँकेचे संचालक राजेंद्रशेठ राजपुरे यांच्या नियोजनातून गावोगावी राजपुरी, खिंगर, आंब्रळ, गोडवली, बोंडारवाडी ग्रामपंचायत कार्यालयात बहीण माझी लाडकी योजनेचे कॅम्प माध्यमातून आतापर्यंत ३८६ अर्ज भरण्यात आले आहेत.

**तालुक्यातील अनेक दुर्गम भागातील अनेक गावांत असे कॅम्प माध्यमातून अर्ज भरण्याचे नियोजन करण्यात येणार आहे.. पूर्णतः ही सुविधा मोफत उपलब्ध असून तालुक्यातील पात्र महिलांनी अर्ज भरून घ्यावेत असे आवाहन जिल्हा बँकेचे संचालक राजेंद्र राजपूरे यांनी केलं आहे.**

यासाठी अंगणवाडी सेविका व महिला बचत आय सी आर एस (समूह संसाधन व्यक्ती) या महिलांच्या माध्यमातून गावांतील योजनेसाठी पात्र महिलांचे प्रत्येक ग्रामपंचायत कार्यालयात कॅम्प घेऊन अर्ज भरत आहेत. त्यामुळे महाबळेश्वर तालुक्यातील अंगणवाडी सेविका व महिला बचत सेविकांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

**पाचगणी येथे समाजसेवक प्रकाश गोळे यांच्या नियोजनातून सिद्धार्थ नगर, शाहू नगर, पॉवर हाऊस, आंबेडकर कॉलनी, पाचगणी येथे बहीण माझी लाडकी योजनेचे कॅम्प माध्यमातून असंख्य ऑनलाईन अर्ज भरले आहेत.**

सध्या मोबाईल नेटवर्क समस्या अतिवृष्टीसारख्या एक ना अनेक समस्यां तालुक्यात असतानाही 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण' योजनेचे अर्ज भरणे जात आहेत, त्यांच्या प्रभावी कामामुळे या पाच गावातील यामध्ये राजपुरी, १२५, खिंगर, ७० आंब्रळ,५५ गोडवली, ८६,बोंडारवाडी ४८ असे पात्र महिलांचे अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरण्यात आले आहेत.

# जाती पातीचं राजकारण न करता माण खटावचा दुष्काळ संपवण्यासाठीच माझी आमदारकी : आ. गोरे

### वडूज शहरात सुमारे पाच कोटी रुपये निधीच्या विविध विकास कामांचं आ.गोरेंच्या हस्ते भूमिपूजन

**वडूज :** माण खटाव मतदार संघाच्या विकास कामी निस्वार्थ पणे काम करत आलो असून आतापर्यंत उरमोडी जलसिंचन योजना, जिहे कटापूर योजना, टेम्भू योजना आदी योजनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या शेतीला पाणी देण्याबरोबरच मतदार संघात खेडोपाडी आणि शहरात राज्यमार्ग, अंतर्गत रस्ते, गटारं, पाणीपुरवठा योजना आदी विकास कामं मोठया प्रमाणावर पूर्णत्वास आली आहेत. अजूनही अनेक विकास कामं करायची आहेत. म्हसवड येथील ग्रीन कोरीडोरचं काम पूर्ण करून हजारो बेरोजगार कुटुंबांना काम मिळवून द्यायचं आहे.

मतदार संघातील प्रत्येक गावात आणि शेताच्या बांधावर पाणी पोहोचवायचं आहे. यापुढे माणगंगा आणि येरळामाई या दोन्ही नद्या कोरड्या राहू देणार नसल्याचं सांगून जाती पातीचं राजकारण न करता माण खटाव मतदार संघातील दुष्काळ कायमचा संपवण्यासाठीच माझी आमदारकी असल्याचं मत आ.जयकुमार गोरे यांनी आयोजित कार्यक्रमात व्यक्त केलं.

वडूज ता. खटाव येथे शहरातील विविध विकास कामांच्या भूमिपूजन प्रसंगी आ.गोरे बोलत होते.

यावेळी भाजप तालुका अध्यक्ष धनंजय चव्हाण, जेष्ठ नेते प्रा.बंडा गोडसे,नगरध्यक्षा मनीषा काळे उपनगराध्यक्ष मनोज कुंभार, नगर पंचायत मुख्याधिकारी कपिल जगताप आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते, नगरसेवक, नगरसेविका यांची प्रमुख उपस्थिती होती.

आमदार जयकुमार गोरेंच्या माध्यमातून माजी नगरसेवक निलेश काका गोडसे यांच्या प्रयत्नातुन प्रभाग क्रमांक १ मध्ये विविध अंतर्गत रस्ते कामांसाठी ६० लाख रुपये निधी,एसटी बसस्थानक रिक्षा स्टॉप परिसरात हायमास पोल. प्रभाग क्रमांक १३ मध्ये नगरसेविका स्वप्नांली गणेश गोडसे यांच्या प्रयत्नातुन सुमारे एक कोटी पन्नास लाख रुपये निधीची अंतर्गत रस्ते दुरुस्ती कामं,नगरसेवक अमोल गोडसे यांच्या प्रयत्नातुन ग्रामदैवत श्री ज्योतिर्लिंग मंदिर सभा मंडप आणि वॉल कंपाउंडसाठी ८२ लाख रुपये निधीची कामं नगरपंचायतीच्या वतीने नगरध्यक्षा मनीषा काळे व नगरसेवक यांच्या प्रयत्नातुन,महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानांतर्गत बांधण्यात येणाऱ्या अग्नीशमन केंद्र इमारत बांधकाम व गाडीसाठी अंदाजे १ कोटी ७२ लाखाचा निधी मंजूर असलेल्या विविध विकास कामांचं भूमिपूजन आ.जयकुमार गोरेंसह मान्यवरांच्या हस्ते करण्यात आलं. दरम्यान भाजप तालुका अध्यक्ष धनंजय चव्हाण यांनी आपल्या मनोगतात, आमदार साहेबांनी शहरात नगरसेवकांना जेवढा निधी दिलाय, तेवढा निधी जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांनाही दिला तर जिल्हा परिषद गटात ही विकास करता येईल,अशी इच्छा व्यक्त केली. प्रा. बंडा गोडसे, अनिल अण्णा गोडसे, अप्पासाहेब गोडसे आदींनी आपलं मनोगत व्यक्त केलं. नगरसेविका स्वप्नांली गोडसे यांनी, यापूर्वी अशी विकास कामं होत नसल्याचं सांगत आ.जयकुमार गोरेंच्या माध्यमातून शहरात मोठया प्रमाणावर विकास कामी निधी मिळत असल्यामुळे यापुढे आम्ही ताठ मानेने नागरिकांना मतं मागण्यासाठी फिरून फिर एक बार, जयाभाऊ आमदार म्हणत आ.जयकुमार गोरेंना निवडून आणणार असल्याचं ठामपणे सांगितलं. कार्यक्रमास विविध प्रभागातील मान्यवर नागरिक उपस्थित होते.

# महाविकास आघाडी शेतीमालाला हमीभाव देणार

## आरक्षणाचा प्रश्न सोडवणार. खा. सुप्रिया सुळे



**मसूर :** भ्रष्टाचार मुक्त महाराष्ट्रासाठी महाविकास आघाडी सरकार सत्तेवर आणा. आघाडी सरकार सत्तेवर येतात शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव देणार. नवीन सक्षम निर्णय घेतले जातील. सगळ्या समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न सोडविला जाईल. असे आश्वासन खासदार सुप्रिया सुळे यांनी यशवंतनगर ता कराड येथील सह्याद्री सहकारी साखर कारखान्याच्या कार्यस्थळावर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा महिला मेळाव्यात बोलताना दिले. ५० खोके... एकदम ओके. यातले आम्ही नाही. तुम्ही ५० खोके घेतले. मात्र जनतेच्या भल्याचा विचार केला का असाही प्रश्न सत्तेत असलेल्या शिवसेनेला केला. माजी खासदार श्रीनिवास पाटील, आमदार बाळासाहेब पाटील, शशिकांत शिंदे, सुनील माने, देवराज पाटील, मानसिंगराव जगदाळे, प्रभाकर देशमुख, शहाजी क्षीरसागर, संगीता साळुंखे, संजना जगदाळे, तेजस्वीनी पाटील, समुद्रा जाधव, सुरेखा डुबल, भाग्यश्री भाग्यवंत, रूपाली यादव, प्रशांत यादव, प्रणव ताटे उपस्थित होते.

खासदार सुळे म्हणाल्या, शरद पवार लढवय्ये आहेत. सहनशीलतेची ताकद त्यांच्यात आहे. चिन्ह गेले तरी ते विचलित झाले नाहीत. मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेचे पंधराशे घेऊन प्रश्न सुटणार नाही. मात्र फार्म भरा. हे टॅक्समधील पैसे तुमचेच आहेत. सरकार उपकार करीत नाही. मात्र हाताला काम द्या. महाविकास आघाडी सत्तेवर येताच दुधाला, कांद्याला, सोयाबीनला, कपाशीला भाव देणार.

लोकसभेला लोकांनी दाखवून दिले. आता विधानसभेला आघाडीला सत्तेवर आणा. बुलेटट्रेन, मेट्रोला विरोध नाही. मात्र ग्रामीण भागात एसटी वेळेवर द्या.

शशिकांत शिंदे, सुनील माने, संगीता साळुंखे, संजना जगदाळे, रूपाली यादव यांनीही मार्गदर्शन केले. देवराज पाटील यांनी स्वागत केले. शहाजी क्षीरसागर यांनी प्रास्ताविक केले. समुद्रा जाधव यांनी आभार मानले.

### शरद पवारांचे योगदान महत्त्वपूर्ण..

**कराडला यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मभूमीत शरद पवारांचा महाराष्ट्रात झंझावात सुरू झाला. त्यांनी शेतकऱ्यांचे,सहकाराचे प्रश्न वेळोवेळी मांडले. ३०% महिलांना शासकीय नोकरीत संधी दिली. आता राज्याची अवस्था अधोगतीला गेली. प्रकल्प गुजरातला गेले. गुन्हेगारी वाढली. गहखात्याचा वचक नाही. अशांतता आहे. पणनमंत्री असताना कोरोना काळात कापूस खरेदी केला. शेतकऱ्यांचा माल गेला. शरद पवारांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरले.**

**- आमदार बाळासाहेब पाटील.**

### महिलांचा फिफ्टी-फिफ्टी हक्क....

**महिलांच्या हातातल्या बांगड्या देखाव्यासाठी नाहीत. पुरुषांच्या इतकीच एक ताकद आहे. फिफ्टी-फिफ्टी हक्क आहे. यशस्वी सह्याद्री साखर कारखान्यात चेअरमनच्या बरोबरीने महिला व्हाईस चेअरमन काम करते. हे एक सामाजिक परिवर्तन आहे. विशेषता राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची लोकसभेला हक्काची जागा गेली. शशिकांत शिंदे यांच्या पराभवाची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे. आता हवेत राहू नका सतर्कने विधानसभेला काम करा.**

**- खा सुप्रिया सुळे.**

## माण- खटावमध्ये निश्चितच जीत

**वडूज :** महाराष्ट्राच्या विधिमंडळाची मुदत संपण्यास अडीच महिन्याचा अवधी आहे .सर्वच राजकीय पक्षांनी मोर्चा बांधणी सुरू केलेली आहे. महायुती विरोधात महाविकास आघाडी अशीच राजकीय लढत होणार आहे. याकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे. सातारा जिल्ह्यातील सर्वाधिक उत्सुकता लागलेल्या माण- खटाव विधानसभा मतदारसंघात राष्ट्रीय काँग्रेसचे युवा नेते व हरणाई सूतगिरणीचे प्रमुख रणजीतसिंह भैय्या देशमुख यांना संधी दिली तर महाविकास आघाडी घटक पक्षातील राष्ट्रीय काँग्रेसचा विजय म्हणजेच जीत निश्चित मानली जाऊ लागलेली आहे.

सातारा शासकीय विश्रामगृहात माण- खटाव तालुक्यातील राष्ट्रीय काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व राष्ट्रीय काँग्रेसचे वरिष्ठ नेते आ .पृथ्वीराज चव्हाण यांची भेट घेऊन याबाबत त्यांच्याशी चर्चा केली. अशी माहिती राष्ट्रीय काँग्रेस अधिकृत सूत्रांनी दिली आहे.

# केडीसीसी बँकेच्या संचालकपदी राजेश पाटील बिनविरोध निवड

## संचालक मंडळ बैठकीत पालकमंत्री हसन मुश्रीफ यांच्या हस्ते सत्कार

**कोल्हापूर** : कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालकपदी राजेश पांडुरंग पाटील यांची एकमताने निवड झाली. बँकेचे संचालक व आमदार कै. श्री. पी. एन. पाटीलसाहेब यांच्या निधनामुळे ही जागा रिक्त झाली होती. या जागेवर एकमेव. पाटील यांचा अर्ज आल्यामुळे ही निवड बिनविरोध झाली. संचालक मंडळाच्यावतीने महाराष्ट्र राज्याचे वैद्यकीय शिक्षण व विशेष सहाय्य मंत्री तथा; कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री व बँकेचे अध्यक्ष हसन मुश्रीफ यांनी त्यांचा सत्कार केला.



कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या प्राथमिक कृषी पतपुरवठा, विकास सेवा सहकारी संस्था, संयुक्त शेती संस्था तसेच धान्य अधिकोष सहकारी संस्था तालुका करवीर या प्रवर्गातील रिक्त झालेल्या जागेवर संचालक म्हणून. पाटील यांची बिनविरोध निवड झाली. सूचक म्हणून मंत्री. मुश्रीफ आणि आमदार सतेज उर्फ बंटी डी. पाटील यांनी अनुमोदन दिले. अध्यासी अधिकारी म्हणून सहकारी संस्था उपनिबंधक श्री. नीलकंठ करे यांनी काम पाहिले.

पालकमंत्री. मुश्रीफ म्हणाले, दिवंगत आमदार पी. एन. पाटीलसाहेब यांनी सलग ४० वर्षे बँकेचे संचालक म्हणून काम केले. बँकेच्या प्रत्येक बैठकीला जातीनिशी उपस्थित असायचे. त्यांनी सदैव बँकेच्या आणि शेतकरी हितालाच प्राधान्य दिले. सभागृहाच्या ईशान्य कोपऱ्यातील त्यांची खुर्ची ठरलेलीच असायची. गेल्या तीन बैठका ही खुर्ची रिक्त होती. आज तीमध्ये त्यांचे सुपुत्र राजेश पाटील बसले.

आमदार सतेज उर्फ बंटी डी पाटील म्हणाले, दिवंगत आमदार श्री. पी. एन. पाटीलसाहेब यांचा सहकार- समृद्धीचा आणि शेतकरी हिताचा वारसा त्यांचे सुपुत्र राजेश पाटील सक्षमपणे पुढे चालवतील.

राजेश पाटील म्हणाले, वडील दिवंगत आमदार कै. श्री. पी. एन. पाटीलसाहेब यांचा शेतकरी कल्याणचा वारसा जिल्हा बँकेच्या माध्यमातून मी मनापासून पुढे चालवीन. यावेळी उपाध्यक्ष आमदार राजूबाबा आवळे, माजी खासदार प्रा. संजय मंडलिक, आमदार सतेज उर्फ बंटी पाटील, आमदार राजेश पाटील, माजी खासदार डॉ. श्रीमती निवेदिता माने, ए. वाय. पाटील, प्रताप उर्फ भैय्या माने, बाबासाहेब पाटील -आसुर्लेकर, संतोष पाटील, रणजीतसिंह पाटील, सुधीर देसाई, रणवीरसिंग गायकवाड, विजयसिंह माने, सौ. श्रुतिका काटकर, सौ. स्मिता गवळी आदी संचालक उपस्थित होते.

# तासगाव तालुक्यात सरासरीच्या २५६ टक्के पाऊस

**तासगाव** : तासगाव तालुक्यात यंदा मुसळधार अशा पावसाने कहरच केला आहे. जूनअखेर तालुक्यात सरासरीच्या २४९ टक्के पाऊस पडला होता. जुलै महिन्यात सुध्दा पावसाचा जोर कायम आहे. २० जुलैअखेर तालुक्यात सरासरीच्या तब्बल २५६ टक्के पावसाची नोंद झाली आहे. सरासरीच्या दुप्पट पाऊस पडल्याने पुणदी तलाव १०० टक्के भरला आहे. तालुक्यातील तलावामध्ये सरासरी ७६ टक्के पाणीसाठा आहे. बलगवडे तलावाची पाणीपातळी मात्र अद्यापही सील पातळीच्या खालीच आहे.

कृषि विभागाच्या आकडेवारीनुसार तालुक्यात दरवर्षी सरासरी ५४० मिलीमीटर पाऊस पडतो. यापैकी जून महिन्यात ११४ मिलीमीटर, जुलै महिन्यात १०६ मिलीमीटर, ऑगस्ट महिन्यात ८६ मिलीमीटर तर सप्टेंबर महिन्यात १३३ मिलीमीटर आणि ऑक्टोंबर महिन्यात १०१ मिलिमीटर पाऊस पडतो.

यंदाच्या पावसाळ्यात जूनच्या अखेर तालुक्यात तब्बल २८४ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. मांजर्डे मंडलात सर्वाधिक ३६९ मिलिमीटर तर तासगाव मंडलामध्ये सर्वात कमी १८२ मिलिमीटर पावसाची नोंद झाली.

जुलैमध्ये सुध्दा पावसाचा जोर तसाच आहे. महिन्यात २० तारखेपर्यंत तालुक्यात ९८ मिलीमीटर पावसाची नोंद झालेली आहे. मांजर्डे मंडलात सर्वाधिक ४४१ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे, तर सावळज मंडलात सर्वात कमी २३८ मिलीमीटर पाऊस पडला. २० जुलैअखेर तालुक्यामध्ये सरासरी ३८२ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे.

# गुणवत्तेला आकार देण्याचे काम शिक्षक करतात : विश्वासराव काळे

**वडूज** : वेगवेगळ्या क्षेत्रात विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला आकार देण्याचे मोठे काम प्रामाणिक शिक्षकाकडून केले जाते. असे मत वडूज शिक्षण मंडळाचे विश्वस्त व शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विश्वासराव काळे यांनी व्यक्त केले. येथील हुतात्मा परशुराम विद्यालयातील स्कॉलरशिप, शिष्यवृत्ती, एन.एम.एम.एस., एम.टी.एस. विद्यार्थ्यांच्या सत्कार कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी विश्वस्त डॉ. हेमंत पेठे, सतिश शेटे, प्रशांत शेटे, गोविंद भंडारे, अशोक भंडारे, विजय म्हामणे, चंद्रकांत येवले यांची उपस्थिती होती.

श्री. काळे म्हणाले, ज्याप्रमाणे कारागीर हिर्याला पैलू पाडतो, कुंभार चिखलाच्या मातीला आकार देतो, त्याचप्रमाणे अनेक विद्यार्थ्यांमध्ये असणार्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी शिक्षक प्रयत्न करतात. शाळेतील अनेक प्रतिभावान शिक्षकांमुळे दरवर्षी गुणवान विद्यार्थी घडत असतात. या विद्यार्थ्यांमुळे शाळेचा दिवसेंदिवस नावलौकीक वाढत चालला आहे. गुणवंत विद्यार्थ्यांचा इतरांनी आदर्श घ्यावा असे आवाहनही यावेळी त्यांनी केले. यावेळी डॉ. पेठे, सतिश शेटे, पर्यवेक्षिका भारती माने, एस. डी. घनवट तसेच आदिती तिडके, ज्ञानदा डोंगरे, समृध्दी देवकुळे, वैष्णवी देशपांडे, तनिष्का फडतरे, ओजस शेटे, सुप्रिया खरमाटे या विद्यार्थ्यांची मनोगते झाली. विद्यार्थ्यांनी मनोगतामध्ये आपल्या यशाचे सर्व श्रेय शिक्षक तसेच आई-वडील पालकांना दिले. यावेळी शिष्यवृत्ती परिक्षेसाठी मार्गदर्शन केलेल्या विभागप्रमुख श्री. घनवट, श्री. माने, श्री. जमादार, श्री. लोखंडे, श्री. भोकरे, श्री. पाखले, श्री.चव्हाण, सोमनाथ पवार, मुजावर सर,श्रीमती माने मॅडम, शेटे मॅडम,श्रीमती भोसले मॅडम, फडतरे मॅडम या शिक्षकांचाही सत्कार करण्यात आला.

मुख्याध्यापक डी. जे. फडतरे, पर्यवेक्षक एस. आर. जाधव यांनी स्वागत केले. किरण कांबळे यांनी सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन केले.

# सफाई कामगारांसाठी केंद्रीय आयोग २२ ते २८ पर्यंत महाराष्ट्रात; २७ जुलै रोजी साताऱ्यात

**सातारा** : केंद्रीय सफाई कामगार आयोगाचे अध्यक्ष श्री एम वेंकटेशन हे २२ ते २८ जुलै या कालावधीमध्ये महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येत आहेत. त्यांच्या दौऱ्याची जय्यत तयारी झालेली आहे. पुनर्वसन कायदा,२०१३ म्हणून रोजगारावर बंदी अंतर्गत महाराष्ट्रातील पुणे, सातारा, कोल्हापूर या जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. सातारा जिल्ह्यात शनिवार दिनांक २७ जुलै रोजी आढावा घेण्यात येणार आहे.

या दोऱ्याच्या कालावधीमध्ये पुणे येथील

बी. जे. सरकारी वैद्यकीय महाविद्यालय आणि ससून जनरल हॉस्पिटलचे डीन आणि वैद्यकीय अधीक्षक, संबंधित वरिष्ठ अधिकारी आणि वैयक्तिक कामगार आणि सफाई कर्मचारी मागासवर्गीय व इतर मागासवर्गीय युनियन / संघटना यांच्या नेत्यांसोबत बैठक आहे. केंद्रीय सफाई कामगार अयोग अध्यक्ष समवेत सचिव श्री शशांक सिंह हे सुद्धा दौऱ्यात येणार आहेत.

सफाई कर्मचाऱ्यांच्या विमा व भविष्य निर्वाह निधी याचा तपशील व बैठकीला सर्व वैयक्तिक सफाई कर्मचाऱ्यांनी अनिवार्यपणे उपस्थित राहतील असे निदर्शनास आणलेले आहे.टॉयलेट/बायो टॉयलेट / एम आर एफ केंद्रे, घनकचरा व्यवस्थापन आणि गटार देखभालाबाबत वस्तुनिष्ठ माहिती घेऊन सफाई कामगारांच्या न्याय हक्कासाठी जागरूकता दाखवण्यात येणार आहे. उच्च स्फोटक कारखाना, खडकीचे महाव्यवस्थापक यांच्यासह संबंधित वरिष्ठांची बैठक अधिकारी आणि वैयक्तिक कामगार, सफाई कर्मचारी/ एससी/एसटी/ओबीसी युनियन/संघटनांचे नेते. राष्ट्रीयकृत बँकेचे अधिकारी व व्यवस्थापकीय संचालक, प्रादेशिक कामगार आयुक्त (सी) नागपूर यांच्यासह संबंधित वरिष्ठ अधिकारी आणि वैयक्तिक कामगार आणि सफाई कर्मचारी/एससी/ एसटी/ओबीसी युनियन/चे नेते यांची बैठक संघटना होणार आहे.देहूराव कॅन्टोन्मेंट बोर्ड बैठक आणि संबंधित वरिष्ठ अधिकारी आणि वैयक्तिक कामगार आणि सफाई कर्मचारी व ऑर्डनन्स फॅक्टरी बाबतही चर्चा होणार आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका, कोल्हापूर महानगरपालिका व सातारा नगरपरिषद, आयुक्त, अधिकारी व सफाई कामगार संघटना यांच्याशी चर्चा विनिमय होऊन विविध बँकेची सफाई कामगारांच्या विकासाबाबत माहिती घेतली जाणार आहे. पुणे, कोल्हापूर, सातारा या ठिकाणी दुपारी पत्रकार आयोजित केली आहे. सातारा जिल्ह्यात सामाजिक कार्यकर्ते व उद्योजक राजू जेधे, मनोज सोळंकी व परमार आदी मान्यवर त्यांचे स्वागत करणार आहेत.

आयुक्त समाज कल्याण, पुणे, आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, रेल्वे, मेट्रो रेल्वे विविध राष्ट्रीयकृत बँका यांनी सफाई कामगाराबाबत केलेल्या उपाययोजनांची माहिती घेतली जाणार आहे.

पुणे यांचे महासंचालक आणि विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी पुणे, कोल्हापूर सातारा तसेच जिल्ह्याचे पोलिस आयुक्त आणि संबंधित वरिष्ठ अधिकारी आणि वैयक्तिक कामगार यांची बैठक होणार आहे. या दौऱ्यानिमित्त सातारा पुणे कोल्हापूर विभागातील सफाई कामगारांच्या विविध प्रश्नांबाबत ठोस निर्णय होण्याची शक्यता आहे.

# बिहारला विशेष राज्य दर्जा नाहीच; केंद्र सरकारकडून मिळाला नकार

**नवी दिल्ली** : आजपासून केंद्राचे बजेट अधिवेशन सुरु झाले आहे. उद्या केंद्रीय वित्तमंत्री निर्मला सीतारमण या मोदी सरकारच्या तिसऱ्या टर्ममधील पहिलेच बजेट जाहीर करणार आहेत. मात्र त्यापूर्वी बिहारला मोठा धक्का बसला आहे. आजच्या सत्रामध्ये बिहारला विशेष दर्जा देण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. मात्र केंद्र सरकारकडून या सरकारला पाठिंबा देण्यात आलेला नाही. बिहार राज्याला सध्या देण्यात आलेल्या तरतुदींचा हवाला देत केंद्र सरकारने बिहारला विशेष दर्जा देण्याची मागणी फेटाळून लावली आहे. तरतुदींनुसार बिहारला विशेष दर्जा देणे शक्य नसल्याचे मोदी सरकारने लोकसभेमध्ये सांगितले आहे.

बिहार राज्याला विशेष दर्जाचे राज्य म्हणून मान्यता द्यावी अशी मागणी मागील अनेक वर्षांपासून सुरु आहे. मात्र या वर्षी मोदी सरकार स्थापनेमध्ये नीतीश कुमार यांनी 'किंगमेकर' म्हणून भूमिका बजावली होती. त्यामुळे केंद्र सरकारकडून बिहारचा प्रस्ताव मान्य होईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. मात्र केंद्र सरकारने याबाबत नकारात्मक निर्णय दिला आहे. या निर्णयानंतर बिहारच्या सत्ताधारी पक्षांमध्ये निराशा पसरली आहे. तसेच विरोधकांनी

# पाणी पातळीत वाढ होत राहिल्यास नागरिकांनी वेळेत स्थलांतरीत होवून प्रशासनाला सहकार्य करावे : जिल्हाधिकारी

## पंचगंगेने इशारा पातळी ओलांडली

**कोल्हापूर,** : जिल्ह्यात पावसाचा जोर कायम असून यामुळे पंचगंगा नदीच्या पाणी पातळीत झपाट्याने वाढ होत आहे. पंचगंगा नदीची इशारा पातळी ३९ फूट असून आज ही पाणी पातळी ३९ फुटाच्या वर जावून पाणी धोका पातळीकडे सरकत आहे. पंचगंगा नदीच्या पाण्याची पातळी वाढत राहिल्यास पुराचे पाणी येणाऱ्या भागातील नागरिकांनी वेळेत स्थलांतरीत होवून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी केले आहे.

पूर परिस्थितीच्या अनुषंगाने कोल्हापूर महानगरपालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन कक्षाने सन २०२१ साली कोल्हापूर शहरामध्ये महापुराचे पाणी आलेल्या ठिकाणांची यादी जाहीर केली आहे. त्यावेळी पूर पातळी वाढत जाईल त्यानुसार शहरात काही ठिकाणी महापुराचे पाणी आले होते.

पूर पातळी व शहरातील पुराचे पाणी येण्याची संभाव्य ठिकाणे पुढीलप्रमाणे आहेत.

जिल्ह्यातील राधानगरी धरणात ७.०२ टीएमसी पाणीसाठा आहे. सायंकाळी ४ च्या अहवालानुसार राधानगरी धरणातून १५०० क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरु असून एकूण ७८ बंधारे पाण्याखाली आहेत.



# दातेवाडी येथे लाडकी बहीण योजनेसाठी बचत खात्यांचे वाटप : भारतीय स्टेट बँकेचा उपक्रम

**वडूज** : स्टेट बॅन्क आपल्या दारी या उपक्रमाअंतर्गत दातेवाडी ता. खटाव येथील महिलांची व पुरुषांची बचत खाती काढून खातेधारक महिलांना खातेपुस्तक वाटप करण्यात आले. या बाबत सविस्तर माहीती अशी की, मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेस आवश्यक असणारी राष्ट्रीयकृत बॅन्केची खाती दातेवाडी येथे जावून उघण्यात आली होती. तसेच ज्या पुरुषांची अद्यापही खाती नाहीत अशा पुरुषांचीही नवीन बचत खाती काढण्यात आली. दातेवाडीचे सरपंच बाबासाहेब पवार यांनी गावतील प्रत्येक महिला व पुरुषांना भारतीय स्टेट बॅन्केत खाते उघण्याचे आवाहन केले. त्यानुसार वडूज शाखेचे शाखाधिकारी सुरज कुंभार यांनी दातेवाडी हे गाव दत्तकगाव म्हणून घतले. या गावामध्ये वेगवेगळया योजना राबवायचे ठरविले. त्यानुसार ग्रामपंचायतीचे सरपंच प्रतिनिधी बाबासाहेब पवार यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामपंचायतीच्या ऑफीसमध्ये सर्व खातेदारांना बोलावून त्यांची शुन्य शिलखेची खाती उघण्यात आली. मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेस खातेपासबुक आवश्यक असल्याने आज सर्व खातेदार महिलांना खातेपुस्तकाचे वाटप करण्यात आले. या बचत खात्याव्दारे महिलांना मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना व शासनाच्या इतर योजनांचा लाभ घेता येईल असे कुंभार यांनी सांगीतले. या उपक्रमास दाद देत गावक-यांनी आपली बचत खाती काढण्यास उत्फुर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी लिपिक गणेश निकम, कैलास मुंढे, वैभव सानप, सत्यवान माळवे आदिंचे मोलाचें सहकार्य लाभले.

# शरद पवारांच्या पापाचा पाढा गावागावात वाचणार!

## भाजपाचे सातारा जिल्हाध्यक्ष धैर्यशीलदादा कदम यांची घोषणा

**सातारा** : केंद्र सरकारमध्ये कृषीमंत्री असताना आणि महाराष्ट्रात सत्तेवर असताना शरद पवार यांनी महाराष्ट्रासाठी काहीही केले नाहीच, उलट राज्याच्या विकासाला आणि सामाजिक ऐक्याला बाधा पोहोचविण्याचीच भूमिका घेऊन महाराष्ट्राचे नुकसान केले. शरद पवार हे भ्रष्टाचाऱ्यांचे सरदार असून त्यांनी गैरकारभाराला संस्थात्मक प्रतिष्ठा दिली, हा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलेल्या आरोपाचे पुरावे घेऊन भाजपचे कार्यकर्ते आगामी काळात राज्यात गावागावात जागर करतील, अशी घोषणा भारतीय जनता पार्टीचे सातारा जिल्हाध्यक्ष श्री. धैर्यशीलदादा कदम यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

शरद पवार यांनी लोकसभा निवडणुकीच्या काळात केलेल्या अपप्रचारातील प्रत्येक मुद्द्याचे उत्तर महाराष्ट्रातील जनतेच्या साक्षीने दिले जाईल असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. युपीए सरकारच्या सत्ताकाळात पवार यांनी महाराष्ट्रासाठी काय केले याचा पंचनामाही केला जाईल. पवार यांनी पुण्यातील कोणत्याही चौकात येऊन जाहीर चर्चा करावी असे आव्हान केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी दिले आहे. हिंमत असेल तर पवार यांनी या आव्हानास सामोरे जावे, अन्यथा केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ हे सारा हिशेब उघड करतील व पक्षाचे कार्यकर्ते तो गावागावात पोहोचवतील असा इशाराही या पत्रकात श्री. धैर्यशीलदादा कदम यांनी दिला आहे. दूध भुकटी आयात, साखर कारखान्यांच्या आयकराचा प्रश्न शरद पवारांमुळेच टांगणीवर राहिला असून आरक्षणाच्या मुद्द्यावरील शरद पवारांची भूमिका संशयास्पद असल्याचा आरोपही श्री धैर्यशीलदादा कदम यांनी केला आहे.

# शिरोळ तालुक्यात पूर आल्यास जिल्हाधिकारी जबाबदार : शासनाच्या निषेधार्थ १ ऑगस्ट ला नृसिंहवाडीत जलबुडी आंदोलन

**शिरोळ** : कर्नाटकातील अलमट्टी धरण आणि त्या शेजारचा हिप्परगी बंधारा यामध्ये नियमबाह्य पद्धतीने पाण्याचा साठा केला जात आहे. त्या पाणी साठ्यावर तातडीने नियंत्रण आणा अन्यथा जलबुडी आंदोलन केले जाईल,तसेच शिरोळ तालुक्यात पूर परिस्थिती निर्माण झाल्यास त्याला पूर्णपणे कोल्हापूर जिल्हा प्रशासन जबाबदार राहील असा इशारा आंदोलन अंकुश संघटना आणि कृष्णा महापूर नियंत्रण समिती यांनी आज शासनाला दिला.

अलमट्टी धरण आणि त्या शेजारचा हिप्परगी बंधारा यामध्ये कर्नाटक शासनाचा जलसंपदा विभाग केंद्रीय जल आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन करून भरमसाठ पाणीसाठा करीत आहे. पावसाळ्याची आत्ताच सुरुवात असताना धरणात पाणी साठवून ठेवायचा सपाटा कर्नाटक सरकारने सुरू ठेवला आहे.त्यामुळे कृष्णा खोऱ्यातील सांगली, सातारा आणि कोल्हापूर या तिन्ही जिल्ह्यांना महापुराचा धोका निर्माण होत आहेत.

संभाव्य महापुराच्या धोक्याबद्दल कर्नाटक सरकारबरोबर काही संपर्क साधला आहे असे दिसून येत नाही. तसेच महापुराचा इशारा देणाऱ्या, तो येऊ नये म्हणून खटपट करणाऱ्या आणि महापुराच्या वेळी मदत करणाऱ्या स्वयंसेवी संस्था संघटना यांच्याशीही काही संपर्क साधला आहे असे दिसून येत नाही. यावरून प्रशासनाला महापूर येण्यातच रस आहे अशी दाट शंका येत आहे.

सध्या पावसाचा जोर वाढतो आहे नजीकच्या काळात तो आणखी वाढण्याची शक्यता आहे. कृष्णा खोऱ्यातील कोयना, वारणा, राधानगरी या धरणांच्या पाणलोट क्षेत्रात यापुढे असाच पाऊस पडत राहिला तर पाणी वाढणार आहे. अशावेळी अलमट्टी धरण आणि हिप्परगी बंधारा येथील पाणीसाठा नियंत्रित करण्याची गरज आहे. त्यासाठी आत्तापासूनच या दोन्ही ठिकाणी विसर्ग वाढवण्याचा आग्रह धरला पाहिजे, परंतु उलट प्रकार घडत असून अलमट्टी आणि हिप्परगी येथे नियमबाह्यरित्या पाणीसाठा वाढवला जात आहे.

अलमट्टी धरण आणि हिप्परगी बंधारा येथील पाणीपातळी केंद्रीय जल आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार ठेवली जात आहे की नाही याकडे बारकाईने देखरेख करा. तसे आढळले नाही तर तातडीने कर्नाटक प्रशासनाशी संपर्क साधून पाण्याची पातळी कमी करायचा आग्रह धरा असे स्पष्ट निर्देश मुख्यमंत्र्यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगमध्ये सांगली कोल्हापूरचे जिल्हाधिकारी तसेच जलसंपदा विभागांना दिले होते.परंतु दोन्ही जिल्ह्यातील जिल्हा प्रशासन तसेच कार्यकारी अभियंते यांनी याकडे दुर्लक्ष केले आहे असे स्पष्ट दिसत आहे.

अलमट्टी धरणातील पाणी पातळी ३१ जुलै अखेर ५१३.६०.मीटर आणि ३१ ऑगस्ट पर्यंत ५१७ मीटर असली पाहिजे असा केंद्रीय जल आयोगाचा निर्देश आहे. प्रत्यक्षात अलमट्टी धरणाची पाणीपातळी आत्ताच ५१७ मीटरपेक्षा अधिक आहे. धरणात आवक होणाऱ्या पाण्याच्या तुलनेत विसर्ग (जावक)अत्यंत कमी आहे.अलमट्टी धरणामधील पाणीसाठा आता ९५ टीएमसीच्या पुढे गेला आहे. म्हणजेच ते धरण जवळजवळ ९५ टक्के आत्ताच भरले आहे. हिप्परगी बंधार्याचीही तशीच परिस्थिती आहे.

गेल्या शेकडो वर्षांचा हवामानाचा व पर्जन्याचा अनुभव लक्षात घेतला तर पावसाळ्यातील नऊ नक्षत्रे ही पावसाची म्हणून ओळखली जातात. यावर्षीच्या पावसाळ्यातील पहिली तीन नक्षत्रेहीअजून संपलेली नाहीत. याचा अर्थ पावसाळा सुरू होऊन अजून जेमतेम दोन महिनेसुद्धा झालेले नाहीत. जोरदार पावसाची सहा नक्षत्रे (तीन महिन्यांचा कालावधी) अजून शिल्लक आहेत. तरीही कर्नाटक सरकार व तेथील जलसंपदा विभाग घाई करून धरणात पाणीसाठा वाढवत आहे. ती अत्यंत धोकादायक कृती आहे. पाऊस वाढल्यावर कृष्णा खोऱ्यातील धरणातून विसर्ग वाढणार आहे. त्याच वेळी मुक्त पाणलोट क्षेत्रातूनही मोठ्या प्रमाणावर पाणी कर्नाटकाकडे कृष्णा नदीतून वाहत जाणार आहे.